● मंगळवार, दि. १० डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १३२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
Mob. 8208427524
Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# हिंदू न्याय यात्रेत मोठ्या संख्येने उपस्थिती रहा

## भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांचे आवाहन


**जालना । प्रतिनिधी -** बांग्लादेशमध्ये हिंदू समाज आणि अल्पसंख्यांकांवर होत असलेल्या अन्याय व अत्याचाराविरोधात जागतिक मानव हक्क दिनानिमित्त मंगळवारी (दि.१०) जालना शहरातील अंबड चौफुली ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत बांग्लादेश हिंदू न्याय यात्रेचे पैदल मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वात व भाजपा विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत या संदर्भात आज (दि.०९) रोजी भारतीय जनता पार्टी कार्यालय जालना येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भास्कर दानवे म्हणाले की, बांग्लादेशातील हिंदू, बौद्ध, सिख, ख्रिश्चन यांच्यावरील हल्ले आणि अत्याचार अधिकच वाढले आहेत. अनेक लोकांचे मृत्यु झाले आहेत. हिंदू व्यावसायिक, हिंदू कलाकार, हिंदू नेत्यांच्या हत्या करण्यात आलेल्या आहेत. बांग्लादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात उभे झालेले इस्कॉनचे साधू चिन्मय कृष्णदास यांच्यावर राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याचा खोटा आरोप करून त्यांना अटक करण्यात आली. व्यवसायिक आस्थापनांची जाळपोळ केली आहे. मंदिरांमधील चोऱ्या, देवी देवतांच्या विडंबनेच्या घटनांचा समावेश आहे, महिलांवर बलात्कार, लैंगिक दुव्यवहार, त्यांच्या मृतदेहांची विटंबना केली जात आहे. दुर्दैवाने या घटनातील दोषी मोकाट फिरत आहेत. शांततापूर्ण मार्गाने लढा देणाऱ्या हिंदूंच्या धार्मिक नेत्यांनाच दोषी ठरविले जात आहे. तेथील दलित हिंदू बांधवांसह अल्पसंख्यांकांना जीवन जगणे कष्टप्रद केले आहे. याचा हिंदू बांधवांतर्फे प्रकट निषेध करण्यासाठी व त्यांचे मूलभूत मानवाधिकाराचे संरक्षण व्हावे व संवर्धन व्हावे, यासाठी मोर्चाचे आयोजन केले आहे. या बांग्लादेश हिंदू न्याय यात्रेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले.



यावेळी भाजपा विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष सतीष जाधव, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, विधानसभा प्रभारी बबनराव सिरसाठ यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# परतूरमधील सहयोग नगर भागात नळाला अशुद्ध पाणीपुरवठा



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील सहयोग नगर वॉर्ड नंबर १२ मध्ये गेल्या पाच सहा महिन्या पासून गटारीचे पाणी येत असल्याने नागरिक त्रस्त झाले. परतूर नगरपालिकेच्या भोंगळ्या कारभारावर नियंत्रण कोणाचे असा प्रश्न पडला आहे. प्रभारी मुख्याधिकारी नियमित पालिकेत हजर राहात नसल्याने शहरातील समस्या वाढल्या आहेत. पालिकेचे अधिकारी नसल्याने कर्मचाऱ्यांची मनमानी दिवसन दिवस वाढत असल्याचे दिसत आहे.यामुळे नागरिकांच्या समस्या ची तक्रार कुठे करावी अशी चर्चा शहरात अनेक ठिकाणी होतांना दिसत आहे. शहरात नळाला फिल्टर पिण्याचे पाणी आहे असे फक्त नावाला आहे. नळाला तर चक्क गटारीचे पाणी येत आहे.नागरीकांना अनेक समस्यांना सामोरं जावं लागत आहे.वारंवार तक्रार केली तरी देखील कोन्ही दखल घेत नाही. नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी यावर लक्ष घालण्याची गरज आहे. नसता हे असेच चालत राहीले तर नागरिकांचे आरोग्य धोक्यात यायला वेळ लागणार नाही. नगरपालिकेचे प्रभारी मुख्याधिकारी यांनी ताबडतोब पान २ वर

युवा आदर्श

## गुरु पालखी ...

भजने कवने गाता
चाला आस्ते आस्ते
कळले नाही सरले
किती खडतर रस्ते
दिसले नाही सोबत
होते अदृश्य फरिस्ते
संकट आले परतले
करूनि गेले नमस्ते
जागो जागी भंडारा
पंगत केवढी बसते
अन्नपूर्णा जेवू घाले
कैक भोज परोसते
तहान लागण्यापूर्वी
विहीर समोर दिसते
कोण करतो हे सारे
डोळी धारा बरसते
जमिनीच्या मांडीवर
झोप त्वरीत लागते
हात फिरवे पाठीवर
रात्र रात्रभर जागते
उगवला भाग्य दिस
पहाट भुपाळी गाते
सुचिर्भुत हो तनमन
बरसता भक्ती गिते
पालखी हलकी वाटे
पाऊल भरारा पळते
भोई झालो भाग्याचे
नशीब सुरस फळते

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# मराठा समाजाला न्याय, सक्षमता आणि स्थैर्याच्या दिशेने घेऊन जाण्याचा निर्धार

## मराठा समाजाच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधण्यासाठी राज्यभर संवाद बैठका अभियान



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी - अखिल भारतीय मराठा महासंघाच्यावतीने राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या संकल्पनेतून राज्यभर एक मराठा लाख मराठा संवाद बैठका या अभियानाचा शुभारंभ नुकताच छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत करण्यात येऊन मराठा समाजाला न्याय, सक्षमता आणि स्थैर्याच्या दिशेने घेऊन जाण्याचा निर्धार करण्यात आला.

या बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, सरचिटणीस प्रकाश देशमुख, कोषाध्यक्ष प्रमोद जाधव, उपाध्यक्ष विनायक पवार, विभागीय अध्यक्ष प्रा. गोपाळ चव्हाण, विभागीय चिटणीस आतिश गायकवाड, जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्यासह राज्यभरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना राजेंद्र कोंढरे म्हणाले की, मराठा समाजाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. आरक्षणासाठीच्या संघर्षासोबतच समाजाला आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनवणे अत्यावश्यक आहे. आर्थिक साक्षरता आणि व्यवसाय उभारणीकडे तरुणांनी वळले पाहिजे. 'एक मराठा लाख मराठा' अभियानाच्या माध्यमातून आम्ही मराठा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणार आहोत. आरक्षणाच्या तरतुदीचे कायदेशीर मार्गदर्शन, वेगवेगळ्या योजनांची माहिती आणि त्या कशा राबवायच्या, या संदर्भातील इत्यंभूत माहिती असलेले पुढचे पाऊल हे पुस्तक आतापर्यंत ५० लाख समाज बांधवांपर्यंत पोहोचले आहे, असे त्यांनी सांगितले. मराठा महासंघाचे जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी मराठा संघटन वाढवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

याप्रसंगी शासकीय योजनांची माहिती असलेल्या पान २ वर

## मॅट'च्या ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन

# सेवा विषयक १३८ प्रकरणे तडजोडीने निकाली

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत ५४२ सेवा विषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम यशस्वी करण्यात आला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोक अदालतीसाठी तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुऱ्हेकर, आर. बी. मलिक यांनी काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर. एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अदालतीत बरीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली. या लोक अदालतीमध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये पान २ वर



# आ. संतोष दानवे यांना मंत्रिपद द्या; टेंभुर्णीतील कार्यकर्त्यांची भावना

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** भोकरदन जाफ्राबाद विधानसभेचे आमदार संतोष दानवे यांना मंत्रिपद देण्यात यावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. टेंभुर्णी येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचीही अशी भावना आहे. २०१४, २०१९ आणि आता २०२४ अशा तीन वेळेस आ. संतोष दानवे हे या मतदार संघातून निवडून आलेले आहेत.



संतोष दानवे यांचा जनसंपर्क मोठा आहे, त्यांची काम करण्याची पद्धतही वेगळी आहे. गेल्या तीन टर्म ते भारतीय जनता पक्षाचे आमदार आहेत. या मतदार संघाला तसे आता पर्यंत राज्यात मंत्रिपद मिळालेले नाही. त्यांना मंत्रिपद मिळाल्यास मतदार संघासह राज्यभरात ते चांगल्या रितीने कार्य करु शकतील. त्यांच्या कार्याचा फायदा भाजपासह राज्याला व भोकरदन-जाफ्राबाद मतदार संघाला होईल, त्यामुळे त्यांना मंत्रिपद द्यावी अशी मागणी टेंभुर्णी येथील भाजपाचे कार्यकर्ते राज भाले यांनी केली असून श्री भाले यावेळी म्हणाले की ही संपुर्ण टेभुर्णीकरवासियांची भावना आहे.

# महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी जैन समाज आपले सर्वोच्च योगदान देईल - ललित गांधी

## जैन समाजाचे नीती निर्धारण संमेलन उत्साहात संपन्न; नवनिर्वाचित जैन आमदारांचा सत्कार

**मुंबई । प्रतिनिधी -** देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी जैन समाजाने सातत्यपूर्ण योगदान दिलेले आहे. या पुढील काळातही जैन समाज आपले सर्वोच्च योगदान महाराष्ट्राच्या व देशाच्या विकासासाठी देईल असा निर्धार जैन समाजाच्या नीती निर्धारण संमेलन प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघ या समस्त जैन समाजाच्या राष्ट्रीय शिखर संस्थेतर्फे नीती निर्धारण संमेलन, संस्थेची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक, महाराष्ट्रामध्ये निवडून आलेल्या जैन आमदारांचा सत्कार व महाराष्ट्र सरकारने नव्याने बनवलेल्या जैन आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजाची रूपरेषा असा संयुक्त कार्यक्रम सिडेनहम कॉलेजच्या सभागृहात संपन्न झाला. त्याप्रसंगी अध्यक्ष भाषणात मार्गदर्शन करताना त्यांनी हा निर्धार व्यक्त केला.

याप्रसंगी जितो अपेक्स चे राष्ट्रीय अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी, रुणवाल समूहाचे प्रमुख सुभाष रुणवाल, भारत जैन महामंडळाचे अध्यक्ष सी.सी. डांगी तसेच नवनिर्वाचित आमदार चैनसुख संचेती, राजेंद्र यड्डावकर, नरेंद्र मेहता, राहुल आवाडे, अल्पसंख्याक आयोग उपाध्यक्ष चेतन देडिया, पान २ वर



## संपादकीय पान

## रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या सम ाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा सम ावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात.



नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ईपीएस-९५ पेन्शन वाढीबद्दल सरकारचे मौन का?

कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी.यासाठी अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरू आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दु:ख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.

ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.त्यामुळे एनडीए व इंडिया आघाडी यांनी सामंजस्याने एकत्रितपणे निर्णय घेवून सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशनधारकांचा मार्ग मोकळा करून यावर पुर्णविराम लावावा. ईपीएस-९५ पेंशनधारक न्याय मिळेल या आशेवर पेंशन धारकांची आताही उम्मीद टीकुन आहे. म्हणजेच उम्मीद पर दुनिया कायम है लोकसभेत दुनीयाभराचा गोंधळ होतो व सभा तहकूब होते व यावर करोडो रूपयांचा चुराडा होतो.परंतु करोडो पेंशन धारकांबद्दल पक्ष-विपक्ष एकमत होत नाही ही वृध्दाच्या प्रती (सिनियर सिटीझन)च्या प्रती मोठी शोकांतिका आणि दुर्भाग्य म्हणावी लागेल.परंतु आम दार-खासदार आपले पगार व पेंशन वाढीचे विधेयक एका मिनिटात सर्वानुमते पारीत करतात.परंतु ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत, मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते आहे.परंतु पेन्शन धारक आशावादी आहेत त्यामुळे सरकार त्यांना अवश्य न्याय देईल असा पेंशन धारकांना विश्वास आहे. आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.

या अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा१००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य पक्ष-विपक्ष किंवा सरकारला का दिसत नाही?त्यामुळे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस पेन्शन धारकांचा विचार करून कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागू करण्याची घोषणा सरकारने करावी.

ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर,महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने व पक्ष-विपक्षाने ताबडतोब घ्यावी व ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावावा. केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले आहेत. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे.त्यामुळे आता सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता चालू असलेल्या अधिवेशनात कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय घ्यावा.

आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे याचे संपूर्ण दायित्व पक्ष-विपक्षांचे आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४० कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी दिड कोटी पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी व पेन्शनसाठी वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दु:ख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू आहे याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. मागील अधिवेशनात सरकारने अनेक विधेयक आणलीत व मंजूर केली. परंतु पेन्शन धारक आपल्या हक्काची लढाई लढत असताना सुध्दा त्यांच्या हाती निराशाच आली. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले. तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते.मागील अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखम ेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली.

ईपीएफचा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे. त्यामुळे सुरू असलेल्या अधिवेशनात ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत.



त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.

त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने व पक्ष-विपक्षाने ठेवली पाहिजे. राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसम ोर उपस्थित होतो.मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे म नापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दा चालू अधिवेशनात कमी कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या दिड करोड पेंशन धारकांना आहे. जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार (माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर). मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसीचे प्रभारी प्राचार्य मुजाहिद पठाण यांना पेटंट प्रदान

**टेंभुर्णी** - येथील जिजामाता ग्रामीण विकास व शिक्षण संस्था संचलित सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य मुजाहिद नसीर पठाण यांना पेटंट प्रदान करण्यात आला. मुजाहिद पठाण यांनी णपळींशव ज्ञळपसवो (युके) सरकारकडे ऑटोमेटेड इन्फ्युझिअन अपेरेटस फॉर टार्गेटेड लीपोझोमल थेराप्युटीक डिलिव्हरी या उपकरणाचे पेटंट मिळविण्यासाठी नोंदणी केली होती. त्यास मंजुरी मिळून युके सरकारकडून त्यांना पेटंट मिळाले त्याची अधिकृत नोंद पेटंट जनरल मध्ये झाली आहे. भविष्यात या उपकरणाचा फायदा औषध निर्माण क्षेत्रातील उद्योगांना होणार आहे. त्यांना या संशोधनासाठी डॉ. व्ही.आर. पवार सर यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाला मिळालेले हे पहिले पेटंट आहे.

## ईडी, आयकर, सत्ताधाऱ्यांना लाचार करणारा नेता

सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळा, पंचवीस हजार कोटींचा बँक घोटाळा एवढे डोंगराएवढे आरोप अजित पवार यांच्यावर आहेत. देशाचे पंतप्रधान जबाबदारीने जाहीर सभेत अजित पवार यांचा सिंचन घोटाळा उघड करतात देवेन्द्र फडणवीस यांनी चक्की पिसींगची जाहीर धमकी देऊन झाली पण केले काहीच नाही. कित्येक हजार कोटीची देणगी दिली असावी आणि ईडी आयकर खात्यालाही भरभरून मलिदा दिला असावा? म्हणून अजित पवार भाजपमध्ये सामील होताच त्यांच्यावरचे सर्व आरोप मागे घेऊन त्यांना क्लीन चिट देतात हा भाजप पक्षाचा मोठा आर्थिक भ्रष्टाचार नाही काय? आयकर, ईडी यांना जनतेच्या करातून सर्व लाभ मिळतात ह्याची जाणीव ठेवून ह्या यंत्रणानी आर्थिक गुन्ह्याचा शोध घेऊन निस्वार्थपणे आपले कर्तव्य



बजावले पाहिजे. परंतु तसे होतांना दिसत नाही. भ्रष्टाचार थांबणार नाही, यंत्रणा कर्तव्य बजावणार नाही तर त्यांना फ ुकट पोसून उपयोग काय? सदर यंत्रणा बंद कराव्या अथवा त्यांच्याकडे जेव्हढ्या भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचाऱ्यांच्या फाईल असतील त्यावर कठोरपणे कारवाई करावी. कोणाचाही मुलाहिजा न बाळगता वा दबावाला बळी न पडता आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

महायुतीचे सरकार स्थापन होताच अजित पवार ह्यांची एक हजार कोटीची मालमत्ता आयकर विभागाने त्यांना सुपूर्द करण्याचा निर्णय घेऊन अजित पवार ह्यांना मोठा दिलासा दिला. आयकर विभागाने हे सर्व योग्य वेळ पाहून घेतलेला निर्णय वाटतो ह्यामागे काही राजकीय षडयंत्र असावे अशीही शंका येते. अजित पवार सारख्या सक्षम राजकीय नेत्याविरुद्ध त्यांना बदनाम करण्यासाठी केलेले षडयंत्र असेल तर दोषी आयकर अधिकाऱ्यांना जाब विचारून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली पाहिजे.अजित पवार यांची एक हजार कोटीची मालमत्ता भ्रष्टचारातून कमावलेली असेल तर ती जप्त होणे आवश्यक आहे त्यासाठी संबंधित आयकर अधिकारी व अजित पवार यांची व्हिडीओ कॉन्सफरिंग द्वारे नार्को टेस्ट घेऊन सत्य काय आहे देशाच्या जनतेला कळले पाहिजे.दोघेही दोषी आढळल्यास त्यांना सश्रम करावासाबरोबर त्यांची सर्व जंगम मालमत्ता जप्त केली पाहिजे. जनतेने, प्रसारम ाध्यमांनी, समाजसेवकांनी हि प्रशासकीय राजकीय भ्रष्ट व्यवस्था नष्ट करण्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे. असे जर झाले तर आपल्या देशात कायदा सुव्यवस्थतेचे राज्य आहे असा संदेश संपूर्ण देशात जाऊन भ्रष्टाचाराला आळा बसेल



**यशवंत चव्हाण, सीबीडी बेलापूर.**

## पान १ वरुन

### परतूरमधील सहयोग ...

यावर उपाय म्हणून नळाची पाईपलाईन जिथे फुटलेली आहे ती लवकरात लवकर दुरुस्त करून घ्यावी.व सहयोग नगर भागातील नागरिकांना फिल्टर पाणी नसेल तर चालेल पण शुद्ध पाणी सोडण्यात यावे नाहीतर सहयोग नगर येथील नागरिकां च्या वतीने नगरपालिके समोर उपोषण करण्यात येईल असा इशारा यावेळी नागरीकांनी दिला आहे.

### मराठा समाजाला ...

पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच मराठा समाजाच्या आरक्षणासाठी न्यायालयीन लढाईसह समाजासाठी असलेल्या योजनांची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू, अशी शपथ पदाधिकाऱ्यांनी घेतली. या बैठकीत राज्यभरात जिल्हानिहाय जिल्हा संपर्क प्रमुखांच्या नियुक्त्या आल्या. छत्रपती संभाजीनगर जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून अशोक पडुळ यांची नियुक्ती करण्यात आली.

या बैठकीला जालन्यातून कोषाध्यक्ष अशोक पडूळ, सुभाष चव्हाण, ॲड. शैलेश देशमुख, बबन गवरे, बाळकृष्ण उबाळे, कैलास ढमाळे, विष्णू पिवळ, रवी सूर्यवंशी, सौ. मंगल कोरडे, सौ. वृषाली देशमुख आदींची उपस्थिती होती.

### सेवा विषयक ...

मुंबई खंडपीठाच्या- २३८ प्रकरणांपैकी ३९ तर नागपूर-खंडपीठाच्या १५० पैकी ६३ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी

लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषि विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाही. त्याम ुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरीत रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे. या निर्णयामुळे माजी सैनिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही.

लोक अदालत यशस्वी करण्यासाठी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागातील सचिव यांच्यासह न्यायाधिकरणामधील सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्य सादरकर्ता अधिकारी, न्यायाधिकरण बार असोसिएशनम धील सर्व वकील, शासनाचे सर्व नोडल अधिकारी यांनी सहकार्य केले.

### महाराष्ट्राच्या सर्वांगीण ...

जैन महामंडळाचे उपाध्यक्ष नितेश नाहटा, राष्ट्रीय महामंत्री संदीप भंडारी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते ललित गांधी पुढे म्हणाले की जैन समाज व्यापार उद्योग या क्षेत्रामध्ये अग्रेसर असल्याने सर्वाधिक रोजगार देणारा समाज म्हणून ओळख निर्माण करण्याबरोबरच सर्वाधिक कर भरणारा तसेच सामाजिक क्षेत्रात सर्वाधिक योगदान देणारा समाज म्हणून ओळखला जातो. येणाऱ्या दहा वर्षांमध्ये महाराष्ट्र सह देशाच्या विविध भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण व महिला सक्षम ीकरण या क्षेत्रामध्ये विशेष सामाजिक उपक्रम राबवण्याबरोबरच युवकांना व्यापार उद्योगात प्रोत्साहन करण्यासाठीचे उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पृथ्वीराज कोठारी यांनी क्षळीं च्या माध्यमातून प्रशासकीय सेवे मध्ये जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच्या प्रशिक्षण योजनेबद्दल ची माहिती दिली.

भारत जैन महामंडळाचे अध्यक्ष सी सी. डांसळ यांनी अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघाचे उपक्रमांमध्ये संस्थेचे सहयोग दिले जाईल अशी घोषणा केली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगावे यांनीही आपले मनोगत याप्रसंगी व्यक्त केले.

आमदार चैनसुख संचिती यांनी त्यांच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेत जैन समाजाने या पुढील काळामध्ये राज्याच्या विकासामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात योगदान देण्यासाठी विशेष पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी जैन एकतेची आवश्यकता व अन्य समाजासाठी आदर्शवत असे काम उभारण्याची गरज प्रतिपादन केली. राहुल आवाडे यांनी विधानसभेत काम करण्याच्या मिळालेल्या संधीचा राज्याच्या विकासासाठी उपयोग करू व युवकांना अधिकाधिक व्यापार उद्योगांमध्ये पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करू असे सांगितले.

आमदार नरेंद्र मेहता यांनी जैन समाजाने दिलेल्या विविध योगदानांचा गौरवपूर्ण उल्लेख करून, या पुढील काळातही जाहीर समाज आपली सामाजिक बांधिलकी कायम ठेवेल अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी तमिळनाडू अल्पसंख्यांक आयोग चे सदस्य प्रवीण टाटिया, कर्नाटका अल्पसंख्यांक आयोगचे सदस्य महेंद्र सोळंकी, राष्ट्रीय संयुक्त मंत्री सौरभ भंडारी (रतलाम) मध्य प्रदेश महासंघचे अध्यक्ष उमेश जैन, हैदराबाद महासंघाचे संयोजक मुकेश चव्हाण, गुजरात महासंघचे प्रदेश संयोजक राजेश रंका, महासंघाच्या राष्ट्रीय महिला प्रमुख रुचिरा सुराणा, राष्ट्रीय सहमंत्री विकास अच्छा, फॉम चे जितेंद्र शाह व म हाराष्ट्र्च्या विविध जिल्ह्यातून पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राष्ट्रीय महामंत्री संदीप भंडारी यांनी केले.

# मनपाची अतिक्रमण धारकांवर कारवाई

## मनपाची कारवाई केवळ प्रसिद्धीपुरती मर्यादीत?





जालना । प्रतिनिधी - शहर महानगर पालिकेच्यावतीने जालना शहरात बस स्थानक परिसरातील अतिक्रमण सोमवार (दि ९) रोजी काढण्यात आले आहे. अतिक्रमण काढण्याच्या मोहिमेबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत असले तरी अतिक्रमण काढल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण होवू नये याची दक्षता शहर महानगर पालिकेने घेणे आवश्यक असून ही कारवाई केवळ प्रसिद्धी पुरती मर्यादीत राहू नये अशी माफक अपेक्षा जालनेकरांकडून व्यक्त होत आहे.

बस स्थानक परिसरात झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीचा या ठिकाणी नेहेमीच खोळंबा होत होता. बस स्थानकाता प्रवेश-निकास करणाऱ्या बसला या अतिक्रमणाचा मोठा फटका सहन करावा लागत होता. हे अतिक्रमण मोकळे झाल्याने आता वाहतुकीचा प्रश्न सुटणार असल्याने नागरिकांनी या कारवाईबाबत समाधान व्यक्त केले आहे. मात्र, ज्या प्रमाणे यापुर्वी मनपा कडुन काही महिन्यांपुर्वी रेल्वे स्थानक परिसर, गांधीचमन परिसर, मुथा बिल्डींग परिसर, मंठा चौफुली परिसर, नुतन वसाहत परिसर आदी शहरातील विविध भागात अतिक्रमण काढण्याची मोहिम हाती घेतली होती. अनेक अतिक्रमणे काढण्यात आली होती. ज्या ठिकाणची अतिक्रमणे काढण्यात आली होती त्यातील बऱ्याचशा ठिकाणी पुन्हा जैसे थे अतिक्रमणे झालेली पहायला मिळत आहेत. त्यामुळे शहर मनपाच्यावतीने केवळ प्रसिद्धी पुरती कारवाई न करता भविष्यात त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी अपेक्षा जालनेकरांकडून व्यक्त करण्यात येते आहे.

### अनाधिकृत फलक, बॅनर्स, होडिंग्ज?

मागील आठवड्यात शहर मनपाच्यावतीने अनाधिकृत फलक बॅनर्स, होर्डिग्ज धारकांवर कारवाई करण्यात येणार असल्याबाबत प्रसिद्धीपत्रकाद्वारे सुचित करण्यात आले होते. यावर त्याच आठवड्यात २२-२३ जणांवर दंडात्मक कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात आले होते. यानंतर मात्र, ही कारवाई थंड बस्त्यात पडली की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील मंठा चौफुली ते अंबड बायपासकडे जाणाऱ्या मार्गासह मंठा चौफुली ते गुरुबचन चौकात मोठ्या प्रमाणात विद्युत खाबांवर बॅनर्स लागलेले दिसत आहेत. असे असतांना त्यांच्या विरोधात दंडात्मक अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई अद्याप का करण्यात आली नाही असा प्रश्न सर्व सामान्यांना पडला आहे.

## निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षणासाठी बुधवारी परिचय कार्यशाळेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसुचित जाती/जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत मोफत १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकास कार्यक्रमांचे सविस्तर माहिती मिळण्याच्या दृष्टीने बुधवार दि. ११ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे मोफत उद्योजकता परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी इच्छुकांनी उपस्थित राहून कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी केले आहे.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसुचित जाती/जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत मोफत १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उद्योजकीय प्रेरणा, उद्योजकीय गुणसंपदा, विविध संधी मार्गदर्शन, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, उद्योगाला आवश्यक विविध परवाने, शासकीय व निमशासकीय विविध कर्ज योजना, खेळत्या भांडवलाचे व्यवस्थापन, प्रकल्प अहवाल तयार करणे बँकेची कर्ज प्रक्रिया, आदिबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. तसेच प्रशिक्षण पश्चात उद्योग सुरू करण्यासाठी हॅन्ड होल्डिंग सपोर्ट महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत केला जाईल.

सदरील प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्रशिक्षणार्थी हा फक्त अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थीकडे जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, आधार कार्डची छायांकित प्रत असणे गरजेचे असून उमेदवार हा १८ ते ४० या वयोगटातील असणे आवश्यक आहे. असे एमसीईडी विभागीय अधिकारी सुदाम थोटे व प्रकल्प अधिकारी विनोद तुपे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

झाडे लावा झाडे जगवा

## आगळावेगळा कवीची साहित्य प्रतिभा पाहून मी भारावून गेलो - उमेश काळे

### दिव्यांग कवी आकाश देशमुख यांचा विशेष सत्कार

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती लेखन संस्था यांची जालना जिल्हा कार्यकारणीच्या निवडीसाठी नुकतीच सभा झाली. दिव्यांग कवी आकाश देशमुख यांची विशेष उपस्थिती होती. दिव्यांग कवीची उपस्थिती बघून सहकार्यवाह उमेश काळे भारावून गेले.

जालन्याला साहित्य भारतीच्या बैठकीसाठी जाण्याचे ठरले, तेव्हा टेंभुर्णी येथील आकाश शारदाताई भास्कर देशमुख या कवीला अवश्य बोलवा, असा आग्रह मी प्रा. डॉ. सुहास सदाव्रते यांच्याकडे धरला होता, त्याप्रमाणे रविवार दि. ८ डिसेंबर रोजी साहित्य भारतीच्या जालन्यातील बैठकीला आकाश आला होता. आपण एकीकडे व्हॉटसअॅपच्या अतिरेकी वापरावर टीका करतो, पण हेच अत्याधुनिक तंत्रज्ञान आकाशला आधार देणारे एकमेव साधन आहे. संवेदनशील मनाला हळहळ वाटावे, अशीच आकाशची कथा.

बालपणीच पोलिओसदृश्य आजाराने आकाशला घेरले. दहावीपर्यंत आकाश पाय घासत, अडखळत कसाबसा शाळेत गेला. पण नंतर सगळेच थांबले. अंग लुळे पडल्यासारखे झाले. बोलता येईना, चालणे संपले, थोडेफार हात चालत होते, त्यालाही काहीशी मरगळ आली आणि आकाशला एका जागेवर नुसतेच बसण्याची पाळी आली. केवळ मेंदू शाबूत असल्याने हवे नको ते कळते. यंत्रवत जगणे नशिबात आले, पण या दिव्यांग परिस्थितीवर आकाशने मात केली. आपल्याला मोबाईलवर टाइप करता येते ना ही बाब हेरून आकाश लिहिता झाला. मनाची अस्वस्थता व्हॉटसअॅपच्या माध्यमातून बाहेर पडू लागली. प्रा.सदाव्रते यांच्याशी आलेल्या संपर्कानंतर 'खास ध्यास कविता' हा त्याचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. कोणाच्याही नशिबी नसावे अशा आजारपणाशी एकीकडे रोजचा संघर्ष तर दुसरीकडे मनातील विचार व्हॉटसअॅपवर शब्दबद्ध करायवाचे ही कमालच म्हटली पाहिजे.(स्टीफन हॉकींगची आठवण यावी असे हे जीवन). जालन्याच्या बैठकीला उपस्थित असलेल्या आकाश, त्याचे आई वडिल यांचा सत्कार करण्याचे भाग्य लाभले.. आकाशने साहित्य जगतात उंच भरारी मारावी, अशा साहित्य भारतीच्या वतीने याप्रसंगी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आकाश देशमुख यांचा विषय सत्कार करण्यात आला त्यास शाल श्रीफळ आणि पुस्तक देण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांमध्ये सहकार्य व उमेश काळे, डॉक्टर सुहास सदावर्ते, रसना देहाडकर, संजय देशमुख, मुकुंद दुसे, डॉक्टर गोपाल तुपकर,मनीष पाटील शुभांगी लिंगायत, आरती सदावर्ते, आरती जोशी लक्ष्मीकांत दाभाडकर, डॉक्टर वैभव अंबावाडीकर, कैलास भाले, रमेश देहडकर, सुनिता शेळके भास्करराव देशमुख बंडू शेळके, प्राध्यापक पंढरीनाथ सारखे, कवी प्रभाकर शेळके, आदि उपस्थित होते.

### सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

## राष्ट्र प्रेमाची भावना मनात ठेवून ध्वजदिन निधी संकलनात अमुल्य योगदान द्यावे - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** भारत देशाच्या संरक्षणासाठी आपले वीर सैनिक देशाच्या सिमेवर कोणत्याही वातावरणात आपली सेवा निष्ठेने बजावत असतात. सैनिक अत्यंत कठीण वातावरणासह परिस्थितीला सामोरे जावून देशाच्या सिमेचे दिवसरात्र संरक्षण करत असतात. तरी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अधिकाऱ्यांसह नागरिकांनी राष्ट्र प्रेमाची भावना मनात ठेवून ध्वजदिन निधी संकलनात आपले अमुल्य योगदान द्यावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ जालना येथील सैनिकी लॉन्सवर पार पडला. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी महापालिका उपायुक्त नंदा गायकवाड, सेवानिवृत्त स्क्वॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. रुपाली सरोदे, जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक योगेश सारणीकर, शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, आपले सैनिक सिमेवर खडा पहारा देत असल्याने आपण देशांतर्गत निर्भय जीवन जगत असतो. लोकशाहीचे मुल्य अबाधित ठेवण्यास तसेच देशाच्या प्रगतीत सैनिकांचा मोलाचा वाटा आहे. जो देश आर्मी व मिल्ट्रीचा चुकीचा अवलंब करतो तो देश कधीही प्रगती करु शकत नाही. नवीन पिढीला सैनिकांच्या भावना समजण्यासाठी शाळेतील विविध कार्यक्रमात एखादा भाग सैनिकांवर आधारित ठेवण्यात यावा. नागरिकांनी सार्वजनिक जीवनात सैनिक, माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी यांचा नेहमी आदर करावा. असे सांगुन सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचे गेल्या वर्षी दिले गेलेले उद्दीष्ट सर्व



कार्यालय प्रमुखांनी पुर्ण केले त्याबद्दल अभिनंदन करत चालु वर्षाची उद्दीष्टपूर्ती करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचा सैनिकांच्या कल्याणकारी योजनांसाठी वापरण्यात येत असतो. जालना जिल्ह्याला सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे दिले गेलेले उद्दीष्ट २२१ टक्के पुर्ण केले आहे. सर्वांनी सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास मदत करावी. असे सांगून सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे महत्व प्रास्ताविकातुन सेवानिवृत्त स्क्वॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. रुपाली सरोदे यांनी समजावुन सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व शहिदांना आदरांजली अर्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गोविंद इंगोले यांनी करुन आभार मानले. पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांनी हम सब भारतीय है..! हे संगीतबध्द गीत सादर केले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच मागील वर्षी उत्कृष्ट निधी संकलन केलेल्या कार्यालय प्रमुखांचा गौरवही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी, एनसीसी, पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थी, नागरिक, विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## अविस्मरणीय स्नेहमेळा; ४९ वर्षांनी झालेले हृदयस्पर्शी पुनर्मिलन..!

**कणकवली । प्रतिनिधी -** वर्ग मित्र भेटले कीं, पहिले वर्गातील बेंच पार्टनर आठवतात. ती बेंच, केलेली मजा-मस्ती, मारामारी, खेळ या आठवणी जाग्या होतात. कणकवली येथील एस.एम.हायस्कूलच्या एस.एस.सी.१९७६ बॅचचे ३३ वर्षांनी २००९ मध्ये पहिले गेट-टुगेदर संपन्न झाले होते. अलिकडच्या काळात सतत चारपाच वर्षे गेट-टुगेदर होत आहे. मात्र यावर्षी एस.एम. हायस्कूलच्या एस.एस.सी. १९७६ चा तीन दिवसीय स्नेहमेळा नुकताच महाड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. माजी विद्यार्थी-विद्यार्थिनीनी आपापल्या कार्यक्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपली. ४९ वर्षानंतरही शिक्षकांप्रेमी आदरयुक्त भीती संपादित केलेल्या ज्ञानाच्या आधारावर समाजात वावरताना ज्ञान प्रदान करणा-या त्या गुरुजनांना न विसरता ४९ वर्षानंतरही मोठे झाले, आजी-आजोबा झाले, तरीही प्रेमवासल्य शिक्षकांप्रती नतमस्तक होत आहेत. कणकवली येथील एस.एम. हायस्कूलच्या एस.एस.सी १९७६ च्या या बॅचचे हे माजी विद्यार्थी-विद्यार्थींनी अभिमानास्पद वाटणा-या गुरुजनांच्या आदर्शनुसार शेती, व्यवसाय, वैद्यकिय क्षेत्र, शैक्षणिक, बॅकींग क्षेत्र, सामाजिक, औद्योगिक क्षेत्र, सरकारी, खाजगी आस्थापनावरुन सेवा निवृत्त होऊन स्नेहमेळाचा आनंद घेत आहेत. प्रत्येकाच्या शालेय जीवनातील आठवणी अविस्मरणीय असतात. मित्रांसोबत मिळुनमिसळुन केलेला अभ्यास, शिक्षकांचे विद्यार्थ्यांवरील असलेले प्रेम आणि वचक, हायस्कूल मधील क्रिडा स्पर्धा, स्नेहसंमेलन, शिक्षकांनी दिलेली शिक्षा अशा विविध आठवणींना उजाळा मिळाला. कर्तव्य आणि कृतज्ञता ही भारतीय संस्कृतीतील महत्वपूर्ण मुल्ये आहेत. कृतज्ञतेची जाणीव असल्यामुळे जुने मित्र-मैत्रिणी भेटल्यामुळे सर्वांच्याच चेह-यावरील आनंद ओसंडून वाहत होता.या तीन दिवसीय गेट-टुगेदर मध्ये महाड शहरातील दिवे आगार येथील श्री सुवर्ण गणेश मंदिर येथील मुर्तीचे दर्शन घेतले.त्यानंतर दिवे आगार बीच वर संध्याकाळी फेरफटका मारला.दुस-या दिवशी रायगड रोप वेची सफर केली. रायगड च्या पायथ्यापासून ते रायगड किल्लयावर रोप वेने जाण्यासाठी फक्त चार मिनेटे लागतात.रोपवेने गडावर जाण्याचा हा क्षण सर्वांनाच रोमहर्षक असाच होता. रायगड किल्यावर मेहडंबरी, शिवाजी महाराजांचे प्रत्येक दालन, बाजारपेठ, तटबंदी, टकमक टोक, हिरकणी बुरुज, धान्य कोठार, महादेव मंदीर, अशी रायगडावरील प्रत्येक ठीकाणांवरील माहिती येथील गाईड ने सविस्तर पणे दिली. येथील शिवकालीन रायगड किल्लयाची गाईड माहिती सांगत असताना स्फुर्तीदायी रोमांच उभा रहात होता. सर्वांनीच रायगड रोप वेचा आनंद घेतला. त्यानंतर रात्रीच्या सत्रात ज्या माजी विद्यार्थी-विद्यार्थ्यींचा नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये वाढदिवस होते ते एकत्रितरित्या केक कापून वाढदिवस साजरा केला. त्यानंतर बालाजी हॉलमध्ये संपन्न झालेल्या ४९ वर्षानंतर प्रथमच भेटलेले आमचे वर्गमित्र, सदाबहार हसमुख प्रसंन्न व्यक्तीमत्व सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ.संदिप कदम यांनी तर सर्वांनाच सुखद धक्का दिला, त्यांनी



प्रास्ताविक तर केलेच,पण स्वतः सर्वांच्याच व्यक्तीमताची ओळख स्वतः डॉ.संदिप कदम यांनी नवर्षाची (२०२५) प्रत्येकाच्या नावाची आकर्षक डायरी व २०२५ चे कॅलेंडर देऊन यथोचित सत्कार केला.यावेळी प्रत्येकाने आपले मनोगत व्यक्त केले.तसेस एस.एम.हायस्कूलच्या एस.सी.सी १९७६च्या स्नेहमेळ्याचे उत्कृष्ट शिस्तबद्ध करणारे माजी विद्यार्थी महाडचे उद्योजक उन्मेश राजेशिर्के व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.मधुरा राजेशिर्के यांनी स्वतःकडून कुशावतीचा कोतवालहे डॉ.कुमार सिंगल (भा.पो.से.) यांच्या घटनेवरिल पुस्तक सर्वांना भेट दिले.

यावेळी कणकवलीतील उद्योजक माजी विद्यार्थी प्रसाद देसाई यांनीही सर्वांना काजुगर भेट दिले.इतरही विद्यार्थ्यांनी गोडधोड खाऊ देऊन तोंड गोड केले.तसेच पालीच्या गणपतीचेही दर्शन घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संदिप उत्कृष्टरित्या केले.आणि संजय पाध्ये,नंदु आळवे,प्रसाद देसाई यांनी सर्वांच्यावतीने आभार मानले. वृंदाचे चिरजिंव नवनीत प्रभुझांन्टे याने तीन दिवसीय स्नेहमेळ्याची उत्कृष्ट फोटोग्राफी केली. कणकवली येथील एस.एम. हायस्कूलच्या एस.एस.सी.१९७६ च्या बॅचच्या स्नेहमेळ्यासाठी उन्मेश राजेशिर्के, सौ.मधुरा राजेशिर्के, संजय पाध्ये, प्रसाद देसाई,नंदु आळवे यांनी विशेष मेहनत घेतली.

## पापळ येथील अपघातग्रस्त कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील पापळ येथील एका अपघातग्रस्त कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देण्यात आली. आ. संतोष दानवे यांनी तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर आपल्या कामाची सुरुवात या कुटुंबाला आर्थिक मदत मिळवून देत केली. त्यामुळे आ. दानवे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पापळ येथील युवा शेतकरी रवींद्र सुखदेव मोरे यांचा मागील पंधरवड्यात अपघात झाला होता. त्यांना अपघातग्रस्त युवकाच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी माजी जि. प. सदस्य दत्तू पंडित, स्वीय सहायक उद्धव दूनगहू, शंकर सवडे, सरपंच नामदेव कुहिरे, पंडित जाधव, दादासाहेब जाधव, कृष्णा जाधव, सुभाष गायकवाड, अनंता जाधव, गणेश खडसे, गणेश कुहिरे, प्रल्हाद मोरे, वाल्मिक म्हस्के, कृष्णा जाधव, दामोदर इंगळे, ज्ञानेश्वर पवार, श्रीकृष्ण जाधव, प्रेमानंद जाधव, प्रल्हाद मोरे, ज्ञानू बोबडे, ज्ञानेश्वर इंगळे, ज्ञानेश्वर मोरे आदी उपस्थित होते. उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज होती. ही बाब आमदार संतोष दानवे यांच्या लक्षात आणून देताच क्षणाचाही विलंब न करता, त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून या अपघातग्रस्त युवकाच्या उपचारासाठी ७५ हजारांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीचा धनादेश संबंधितांकडे सुपूर्द करण्यात आला आहे.



अधिस्विकृती कार्ड नुतनीकरण नामंजूर प्रकरणी रिट याचिकेवर उच्च न्यायालयात सुनावणी

# सर्व प्रतिवादींना नोटिसा बजावण्याचे आदेश

## ‘बरसता तुफान’च्या पत्रकारांची मान्यता कार्डसचे बेकायदेशीररित्या नामंजूर प्रकरण

**जालना | प्रतिनिधी -** जालना, औरंगाबाद आणि मुंबई येथून प्रकाशित होणारे ‘बरसता तुफान’ आवधिकतेच्या मालक-संपादक, विविध प्रतिनिधींना देण्यात आलेले मान्यता कार्डसचे (अधिस्वीकृतीपत्रिका) नुतनीकरण बेकायदेशीररित्या नामंजूर केल्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठात दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी सुनावणी झाली असून, न्यायालयाने या प्रकरणी सर्व प्रतिवादींना नोटिसा बजावण्याचे आदेश दिले व या संबंधाने तीन आठवड्यानंतर सुनावणी ठेवण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राचे चेअरमन ईलियास खान यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अनागोंदी कारभाराच्या संबंधाने शासन दरबारी प्रश्न उपस्थित करून बोगस पत्रकार आणि अकार्यक्षम तथा अनोंदणीकृत व बनावट संघटनांची चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी केली. या मागणीकडे शासनाने सोयिस्कररित्या दुर्लक्ष करून दिनांक ११ जुलै २०२३ रोजी पत्रकारांशी संबंधित विविध समित्या गठन केल्याचे शासन निर्णय निर्गमित केले. या शासन निर्णयाविरूद्ध प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद न्यायालयात रिट दाखल करून कार्यवाही मागणी केली. या याचिकेवर ऑगस्ट-सप्टेंबर २०२३ मध्ये सुनावणी होवून, न्यायालयाने रिट याचिका दाखल करून सर्व प्रतिवादींना नोटिसा बजावण्याचे दिलेले असून, सदर रिट याचिका प्रलंबित आहे. ही रिट याचिका मागे घेण्यासाठी डीजीआयपीआरच्या वरीष्ठ अधिकार्यांनी जिल्हा माहिती अधिकारी औरंगाबादमार्फत ईलियास खान यांच्यावर दडपण टाकण्याचे काम केले. याबाबत शासनाकडे दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी लेखी निवेदन सादर करण्यात आलेले आहे. अधिस्वीकृती समित्यांच्याविरोधात दाखल रिट याचिका मागे घेण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करण्यात आला व प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राचे चेअरम ईलियास खान यांचे मालकीचे आवधिक ‘बरसता तुफान’च्या संबंधित पत्रकारांचे सहा पैकी ५ पत्रकारांचे मान्यता कार्डसचे (अधिस्वीकृतीपत्रिका) नुतनीकरण नामंजूर करण्याची शिफारस करण्यात आली व या संबंधाने शासनाच्यावतीने मान्यता कार्डसचे नुतनीकरण नामंजूरीचे पत्र दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी निर्गमित करण्यात आले. याविरूद्ध बरस्ता तुफान आवधिक्तेने दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी महासंचालकांकडे कायदेशीर अपील दाखल केले. या अपिलांच्या अनुषंगाने महासंचालक यांच्या अनुपस्थितीत डीजीआयपीआरच्या काही कनिष्ठ अधिकार्यांच्या अपील समितीने बेकायदेशीरपणे दिनांक २१ जून २०२४ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीवेळी ‘मॅनेज संस्कृती’तून काही अनियमित वृत्तपत्रांचे व काही बोगस पत्रकारांचे अपील मंजूर करण्यात आले आणि ‘बरसता तुफान’ या आवधिक्तेचे सहा पैकी पाच मान्यताप्राप्त कार्डसचे नुतनीकरणी ‘शिफारस पत्रावर तारीख नमूद नसल्याचे विषद करून कार्डसचे नुतनीकरण अपील नामंजूर करण्यात आले व या संबंधाने औरंगाबाद आनि जालना जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी पत्र निर्गमित केले. महासंचालकांशिवाय इतर कोणत्याही अधिकाऱ्याला अपिलांवर सुनावणी घेण्याचे अधिकार नसल्याने व अपूर्ण कोरम असलेल्या अपील समितीने अनियमित असलेल्या वृत्तपत्रांचे आणि काही बोगस पत्रकारांचे ‘मॅनेज संस्कृती’तून अपील मंजूर केल्याचे ईलियास खान शासन-प्रशासन यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्याने बरस्ता तुफान आवधिक्तेने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात रिट याचिका क्रं. १३४०९/२०२४ दाखल केली. या याचिकेवर दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी मा. न्यायमुर्ती मंगेश एस पाटील आणि मा. न्यायामुर्ती प्रफुल्ल एस खुबालकर यांच्या पिठासमोर सुनावणी झाली असून, महासंचालकसह सर्व प्रतिवादींना नोटिसा बजावण्याचे आदेश देवून, या प्रकरणी पुढील सुनावणी तीन आठवड्यानंतर ठेवण्याचे आदेश दिले आहे. या प्रकरणी याचिकाकर्ताचेवतीने ॲड. रूपेशकुमार बोरा यांनी काम पाहिले त्यांना ॲड. अफझल हुसैन यांनी सहकार्य केले.

# लॉयन्सच्या मोफत शिबिरात १८१ जणांची नेत्र तपासणी



**जालना | प्रतिनिधी -** लायन्स क्लब ऑफ जालना आणि श्रावणभैया भुरेवाल मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात एकूण १८१ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये ६ रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले असून, त्यांच्यावर चिकलठाणा येथील लॉयन्स आय हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या शिबिराचे उद्घाटन माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना डोळ्यांच्या आरोग्याचे महत्त्व विशद केले. श्री. गोरंट्याल म्हणाले की, डोळे हे शरीराचे महत्त्वाचे इंद्रिय असून त्यांची योग्य देखभाल करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. नेत्ररोग लवकर ओळखणे आणि वेळेवर उपचार करणे केवळ आरोग्यासाठीच नाही तर सुखमय जीवनासाठीही आवश्यक आहे. लायन्स क्लब आणि श्रावणभैया भुरेवाल मित्र मंडळ यांनी नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा उपक्रम राबवून समाजसेवेचा आदर्श घालून दिला आहे. या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना नवी दृष्टी मिळेल, असे ते म्हणाले.

याप्रसंगी क्लबच्या सचिव मंजू श्रीमाली, जयप्रकाश श्रीमाली, संगीता भक्कड, बालाप्रसाद भक्कड, विजय दाड, बळीराम बेंद्रे, विठ्ठल दराडे, राजेश लुनिया, श्रावण भुरेवाल, कपिल भुरेवाल, वसंत पारवे, कचरूलाल गौड आणि श्री. आढे यांच्यासह रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या शिबिरामुळे नेत्र तपासणीसाठी आलेल्या रुग्णांना मोफत उपचार, शस्त्रक्रियेची सुविधा मिळाली व हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.